क्र.साप्रवि/रवका/न.क्र.८८७/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १९१ दिनांक १९ / ११ / २००८

विषय : शासकीय समारंभाच्यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्याबाबत, त्यांच्या नावाचा उल्लेख निमंत्रण पत्रिकेमध्ये करण्याबाबत व त्यांना उचित स्थान देणेबाबत.

.....

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.डब्ल्यूआरपी-१००८/प्र.क्र.३४/०८/३० दि.१८.०९.०८ नुसार शासकीय समारंभाच्यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्याबाबत, त्यांच्या नावाचा उल्लेख निमंत्रण पत्रिकेमध्ये करण्याबाबत व त्यांना उचित स्थान देणेबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत तसेच या सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेशही देण्यात आले आहेत.

२. वरील संदर्भात शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०३.०८.२००१ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच वरील सूचनेचा पुनरूच्चार करून या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व संबंधीतांची राहील याबाबत दि.१८.०४.२००६ नुसार परिपत्रकान्वये कळविलेले आहे. तसेच नगरविकास विभागाच्या दि.१८.०८.२००७ च्या परिपत्रकान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रमामध्ये तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि.१७.१०.२००७ च्या परिपत्रकान्वये ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार यांना विश्वासात घेऊन वरील प्रमाणे ते उपस्थित राहणार किंवा कसे ? याबाबतची खातरजमा करुन व समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावांचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नावांचा समावेश करावा व दर्जानुरून आसन व्यवस्था करण्याची दक्षता घ्यावी याबाबत कळविले आहे.

३. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.डब्ल्यूआरपी-१००८/प्र.क्र.३४/०८/३० दि.१८.०९.०८ ची प्रत सर्व कार्यालय प्रमुखांना अवलोकनार्थ व वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सोबत जोडली आहे.

४. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सु. य. पाटील)
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति
विभागीय व त्यावरील स्तराच्या सर्व कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir.F.N.887-RTI*
*19/11/08*

क्रमांक संकीर्ण-२००८/सं.क्र.१५१२ /प्रशा-४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ३० सप्टेंबर २००८.

प्रति,

विकास आयुक्त,उद्योग संचालनालय,मुंबई.
संचालक,शासकीय मुद्रण ,लेखन सामग्री प्रकाशन संचालनालय,मुंबई.
कामगार आयुक्त,मुंबई.
कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई.
संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,ताडदेव, मुंबई.
संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई.
संचालक, श्रम विज्ञान संस्था, मुंबई.
प्रबंधक,औद्योगिक न्यायालये, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामाद्योग मंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कंपनी लिमिटेड, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य ऊर्जा नियामक आयोग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पूणे.
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे,
व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद.
व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर.

**विषय:- शासकीय समारंभाच्या वेळी स्थानिक लोक प्रतिनिधींना निमंत्रित करण्याबाबत, त्यांच्या नावाचा उल्लेख निमंत्रण पत्रिकेमध्ये करणेबाबत व त्यांना उचित स्थान देणेबाबत**

महोदस,

उपरोक्त विषयावरील सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र. डब्ल्यूआरपी-१००८/प्र.क्र. ३४/०८/३०, दि. १८/९/२००८ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. कृपया सदर परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, ही विनंती.

आपला,

(य. टे. पाडवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

E:\prasha-4/General letter/12

**शासकीय समारंभाच्या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्याबाबत, त्यांच्या नावाचा उल्लेख निमंत्रणपत्रिकेमध्ये करणेबाबत व त्यांना उचित स्थान देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.डब्ल्युआरपी-१००८/प्र.क्र.३४/०८/३०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २००८.

संदर्भ : १) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग डब्ल्यूआरपी-१०९८/४१४/३०,दि.१४ जून, १९९९

२) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग डब्ल्यूआरपी-१००१/१०४६/३०, दि.०३.०८.२००१

३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग डब्ल्यूआरपी-१००६/४८४/३०, दि.१८.०४.२००६

४) शासन परिपत्रक नगर विकास विभाग संकीर्ण-२००७/प्र.क्र.९५/२००७/नवि२० दि.१८.०८.२००७

५) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग संकीर्ण-१००७/६३२/प्र.क्र.९७/पंरा-१ दि.१७.१०.२००७

## परिपत्रक

मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली किंवा त्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शासकीय कार्यक्रम/समारंभाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार, नगरसेवक, जिल्हापरिषदेचे सदस्य अशा लोकप्रतिनिधींना निमंत्रित करुन त्यांच्या दर्जानुरुप आसन व्यवस्था करण्याबाबत या विभागाच्या दिनांक १४ जून, १९९९ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, उपरोक्त कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्यास व समारंभाच्या निमंत्रण पत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावाचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नांवाचा समावेश करण्याबाबत या विभागाच्या ३ ऑगस्ट, २००१ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, या विभागाच्या दि.१८ एप्रिल, २००६ च्या परिपत्रकान्वये वरील सूचनेचा पुनरुच्चार करुन या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व संबंधितांची राहील, असे देखील स्पष्ट केलेले आहे.

नगर विकास विभागाच्या दि.१८ ऑगस्ट, २००७ च्या परिपत्रकान्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रमांमध्ये तसेच, ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १७ ऑक्टोबर, २००७च्या परिपत्रकान्वये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक खासदार, आमदार यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे याची संबंधितांनी खातरजमा करुन घ्यावी व समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या

DSC(Adm)



१४

नावाचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नावाचा समावेश करावा व दर्जानुरुप आसन व्यवस्था करण्याबाबत दक्षता घ्यावी, असे आदेश निर्गमित केलेले आहेत.

असे असूनही स्थानिक लोकप्रतिनिधींना शासकीय समारंभाच्या वेळी निमंत्रित न केल्याबाबत व योग्य ते स्थान न दिल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी येत आहेत. ही बाब अत्यंत खेदजनक आहे. वरील सर्व परिपत्रकांचा पुनरुच्चार करुन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मंत्रीमंडळातील सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली किंवा त्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शासकीय तसेच नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्रम/समारंभास स्थानिक लोकसभा सदस्य, स्थानिक राज्यसभा सदस्य, स्थानिक विधानपरिषद सदस्य, स्थानिकविधानसभा सदस्य, नगरसेवक, जिल्हापरिषदेचे सदस्य यांना निमंत्रित करण्यात यावे. **स्थानिक राज्यसभा सदस्य, स्थानिक विधानपरिषद सदस्य यांच्याबाबतीत ते रहात असलेल्या पत्यावरील मतदार संघात कार्यक्रम असल्यास त्यांना निमंत्रित करण्यात यावे.** त्यांना विश्वासात घेऊन ते कार्यक्रमास उपस्थित राहणार किंवा कसे, याची संबंधितांनी खातरजमा करावी. समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेत प्रमुख उपस्थितांच्या नावाचा उल्लेख असल्यास त्यामध्ये त्यांच्या नावाचा समावेश करावा. समारंभाच्या ठिकाणी त्यांच्या दर्जानुरुप आसन व्यवस्था करण्याबाबत दक्षता घ्यावी.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. मंत्रालयीन विभागांनी आपल्या अधिपत्याखालील शासकीय/निमशासकीय कार्यालये, महामंडळे , मंडळे यांच्या निदर्शनास या सूचना आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(शै.वि. बिजूर)**
**सह सचिव व सह मु.रा.अधिकारी,**
**महाराष्ट्र शासन.**

प्रति,
राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
सर्व मा.मंत्री महोदयांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदा, मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी,
निवड नस्ती, का.क्र. ३०.